# सूर्योदय बँकेचे २०० कोटींच्या गुंतवणुकीचे लक्ष्य

**नवी दिल्ली :** सूर्योदय स्मॉल फायनान्स बँकेने विद्यमान व नवी गुंतवणूकदारांकडून पुढील महिन्याच्या अखेरपर्यंत २०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवले आहे. महाराष्ट्रासह अन्य तीन राज्यांमध्ये बँक असून विस्तार योजना पुढे वाढवण्यासाठी बँकेने हे गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवले आहे. एचडीएफसी लिमिटेड, इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन, आयडीएफसी बँक आणि एचडीएफसी लाइफ इन्शुरन्स असे बँकेचे विद्यमान गुंतवणूकदार आहेत.